| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक ११४ वा | शुक्रवार दिनांक १० जुलै २०२६ | पृष्ठ ६ | किंमत ०१ ₹  RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### पोलिसांची अवैध मद्य विरोधी कारवाई

तामलवाडी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत बाबुराव वय ६३ वर्षे, रा.मसाला खुर्द ता. तुळजापूर जि. धाराशिव हे दि ०८.०७.२०२६ रोजी आपल्या राहत्या घराचे समोर जांभळाच्या झाडाखाली अंदाजे १,५२० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या ३८ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये तामलवाडी पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

तुळजापूर पोलीस ठाणे अंतर्गत सुग्रीव वय ६० वर्षे, रा.काक्रंबा ता. तुळजापूर जि. धाराशिव हे दि ०८.०७.२०२६ रोजी तुळजापूर बसस्थानक शेजारी लातुरकडे जाणारे रोडचे डावे बाजूस अंदाजे १०,००० किंमतीची १०० लिटर शिंदी ताडी अम्ली द्रव अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेले जप्त करण्यात आले. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये तुळजापूर पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

कळंब पोलीस ठाणे अंतर्गत रोहीत वय २४ वर्षे, रा.मस्सा खं ता. कळंब जि. धाराशिव हे दि ०८.०७.२०२६ रोजी १८.४० वा. सु. कळंब ते येरमाळा जाणारे रोडलगत मस्सा खं येथील बसस्थानक जवळील पान टपरीच्या बाजूस मस्सा येथे अंदाजे २,१०० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या १५ सिलबंद बाटल्या व १५ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये कळंब पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

### १६७३ सोलार प्लेटस फोडून कंपनीचे केले नुकसान

लोहारा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, दि.२०.०६.२०२६ रोजी होळी शिवाराती शेत गट नं ६४/१ मधील याणारा पॉवर धाराशिव एमएच प्रा.लि. कंपनीच्या सोलार प्लांट मधील १,४९,००,००० किमतीच्या ईएमएमव्हीईई फोटो विलटॅक पॉवर प्रा.लि. कंपनीच्या चालु स्थितीतील एकुण १६७३ सोलार प्लेटस फोडून कंपनीचे नुकसाना अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी केले आहे. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- प्रविण हिंदुराव सोनवणे, वय ४७ वर्षे, व्यवसाय नोकरी डमिनीस्ट्रेशन इक्झीक्युटीव्ह स्टर्लिंग ण्ड व्हिलसन रिनिव्हेबल इनर्जी प्रा.लि. रा. रनुदुलाबाद ता. कोरेगाव जि. सातारा ह.मु. होळी ता. लोहारा जि. धाराशिव यांनी दि.०८.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे लोहारा येथे भा.न्या. सं.कलम ३२४(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## आरटीओ कार्यालयात मराठी भाषा कार्यशाळा, वाहनचालकांनी मराठीचा सन्मान जपावा ; दैनंदिन व्यवहारात मराठीचा वापर वाढविण्याचे आवाहन




धाराशिव (जिमाका) अमराठी ऑटोरिक्षा व टॅक्सी चालकांना दैनंदिन व्यवहारात सहज,प्रभावी आणि आत्मीयतेने मराठी भाषा वापरता यावी,यासाठी महाराष्ट्र शासनाच्या 'महाराष्ट्र माझा, मराठी माझी संवाद भाषा' या उपक्रमांतर्गत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,धाराशिव येथे मंगळवारी (दि. ७ जुलै) व्यावहारिक मराठी भाषा शिकविण्याची कार्यशाळा उत्साहात पार पडली.

महाराष्ट्र राज्य परिवहन विभाग,राज्य मराठी विकास संस्था,कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यशाळेत वाहनचालकांना मराठी भाषेचे सामाजिक,सांस्कृतिक आणि व्यावहारिक महत्त्व पटवून देण्यात आले.

कार्यक्रमात महाराष्ट्र साहित्य संस्थेचे उपाध्यक्ष तथा कोकण मराठी साहित्य संघाचे कार्याध्यक्ष प्रा.डॉ. प्रदीप ढवळ यांनी प्रमुख मार्गदर्शन केले.त्यांनी ग्राहकांशी सुसंवाद साधण्यासाठी,प्रवाशांमध्ये विश्वास निर्माण करण्यासाठी आणि महाराष्ट्राच्या भाषिक संस्कृतीचा सन्मान राखण्यासाठी मराठी भाषेचा वापर अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले.

डॉ.ज्योती ठाकरे,माजी अध्यक्षा, महाराष्ट्र राज्य महिला आर्थिक विकास महामंडळ तथा कोकण मराठी साहित्य परिषदेच्या सल्लागार यांनी प्रशिक्षणातून चालकांना दैनंदिन व्यवहारात उपयुक्त ठरणाऱ्या मराठी भाषेचे धडे दिले.

प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या चालकांना अधिकृत प्रमाणपत्रही प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

कार्यशाळेत उप प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री.हर्षल डाके,प्रा.डॉ.हर्षला, प्रा.लिखिते,प्राचार्य आनंद विश्व गुरुकुल विद्यालय अँड. सुयश प्रधान,तसेच प्राचार्य आनंद गुरुकुल कॉलेज ऑफ लॉ यांनीही मार्गदर्शन केले.त्यांनी मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून महाराष्ट्राच्या संस्कृतीची ओळख असल्याचे सांगत वाहनचालकांनी प्रवाशांशी मराठीत संवाद साधण्याचा अधिकाधिक प्रयत्न करावा,असे आवाहन केले.

या उपक्रमासाठी सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी,मोटार वाहन निरीक्षक, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक तसेच उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,धाराशिव येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.कार्यशाळेला ऑटोरिक्षा मालक,टॅक्सी चालक आणि वाहनचालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोटार वाहन निरीक्षक अनिल खेमनर यांनी केले.

मराठी भाषा व्यवहारात अधिक प्रभावीपणे रुजावी,वाहनचालक आणि प्रवासी यांच्यातील संवाद अधिक सुलभ व्हावा आणि महाराष्ट्राच्या भाषिक अस्मितेला बळ मिळावे,या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला वाहनचालकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## शासनमान्यता नसलेल्या पाच शाळांपासून सावध रहा पालकांना शिक्षण विभागाचे आवाहन

धाराशिव (जिमाका) जिल्ह्यात शासनाची आवश्यक परवानगी न घेता काही खाजगी प्राथमिक शाळा अनधिकृतपणे सुरू असल्याचे तालुकास्तरीय गटशिक्षणाधिकाऱ्यांनी सादर केलेल्या अहवालातून समोर आले आहे.या शाळा शासनमान्य नसल्याने पालकांनी आपल्या पाल्यांचा प्रवेश अशा शाळांमध्ये घेऊ नये,असे आवाहन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) डॉ. रविंद्र खंदारे यांनी केले आहे.

शिक्षण विभागाने जाहीर केलेल्या माहितीनुसार,जिल्ह्यातील खालील पाच शाळा शासनाची परवानगी न घेता सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे.

१. राजे विजयसिंह पब्लिक स्कूल, भूम,ता.भूम,जि.धाराशिव

२. गुरूकुल प्री प्रायमरी स्कूल, संभाजीनगर,मुरूम,ता. उमरगा,जि.धाराशिव

३. डॉ.रामानुजन ई-लर्निंग स्कूल, उमरगा,ता.उमरगा,जि. धाराशिव

४. पोदार इंटरनॅशनल स्कूल, नळदुर्ग,ता. तुळजापूर,जि. धाराशिव

५. नारायणा ई-टेक्नो स्कूल धाराशिव,ता.व जि.धाराशिव

शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे की,शासनाची परवानगी नसलेल्या अशा शाळांमध्ये प्रवेश घेतल्यास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितावर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यामुळे पालकांनी प्रवेश घेण्यापूर्वी संबंधित शाळेला शासनाची अधिकृत मान्यता आहे की नाही,याची खात्री करूनच निर्णय घ्यावा.

दरम्यान,शासनाच्या परवानगीशिवाय सुरू असलेल्या या अनाधिकृत शाळा बंद करण्यासाठी संबंधित शाळांचे व्यवस्थापन व मुख्याध्यापकांना बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ मधील नियम १८ च्या पोटनियम (५) अंतर्गत नोटीस बजावण्यात आली आहे.या तरतुदीनुसार संबंधित व्यवस्थापनावर रुपये १ लाखांचा दंड तसेच शाळा सुरू ठेवल्यास प्रतिदिन रुपये १० हजारांचा अतिरिक्त दंड ठोठावण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याचे शिक्षण विभागाने नमूद केले आहे.

अनधिकृत शाळांविरोधातील ही कारवाई विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित, गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा अधिकार आणि शासनमान्य शिक्षण व्यवस्थेची विश्वासार्हता कायम ठेवण्यासाठी करण्यात येत असल्याचेही शिक्षणाधिकारी (प्राथमिक) डॉ. रविंद्र खंदारे यांनी स्पष्ट केले आहे.

तसेच पालकांनी केवळ शासनमान्यता प्राप्त शाळांमध्येच आपल्या पाल्यांचा प्रवेश निश्चित करून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य सुरक्षित ठेवावे,असे आवाहन त्यांनी केले आहे.

## पै.तानाजीभाऊ जाधव यांच्या टायगर ग्रुपच्या वतीने १००० विद्यार्थ्यांना शालेय पॅडचे वाटप




तुळजापूर (प्रतिनिधी)- तालुक्यातील जळकोट परिसरातील विविध गावातील शालेय विद्यार्थ्यांना पै.तानाजी भाऊ जाधव व पै . जालिंदर भाऊ जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली टायगर ग्रुप महाराष्ट्र राज्याच्यावतीने १००० शालेय पॅडचे व तसेच १० सिलिंग फॅन चे वाटप करण्यात आले.

टायगर ग्रुप हा राज्य पातळीवर काम करणारी सामाजिक संघटना आहे. सामाजिक बांधिलकी जपून टायगर ग्रुपने आत्तापर्यंत विविध उपक्रम राज्यभरात राबवले आहेत. गेल्या वर्षी शालेय विद्यार्थ्यांना पावसाळी छत्रीचे व स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले होते. दरवर्षी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून समाजाच्या सामाजिक उपक्रमात टायगर ग्रुप सहभागी होत असतो. वाढदिवसाला होणारा वायफळ खर्च न करता दरवर्षी शालेय साहित्याचे वाटप करण्यात येते. यावर्षी टायगर ग्रुपच्यावतीने जळकोट केंद्रातील सन २०२६ इयत्ता दहावी व बारावी मध्ये चांगले गुण घेऊन उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना टायगर ग्रुप चे पिंपरी चिंचवड कार्याध्यक्ष अभिजीत भाऊ पवार यांच्या वाढदिवसानिमित्त परीक्षा पॅड देऊन सत्कार करण्यात आला. व तसेच

जळकोटवाडी (नळ) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथील विद्यार्थ्यांना शालेय पॅड चे वाटप करण्यात आले व इंदिरा काळे

प्रशाला येथे शालेय पॅड व शाळेसाठी१० सिलिंग फॅन देण्यात आले. व तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिंगडगाव, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आष्टा (कासार) येथे शालेय पॅडचे वाटप करण्यात आले यावेळी या कार्यक्रमास योगेश भाऊ सोनवणे, संदीप भाऊ मस्के, रोहित भाऊ वावरे, नाना भाऊ कोष्टी, राहुल लातूरकर ,राजू मोतिरावे,महेश बलसरे,मारोती गायकवाड, आदित्य पेटकर, सोन्या मते,बाबा जमादार, सागर शिंदे, चैतन्य सगर

विविध शाळेचे मुख्याध्यापक, सहशिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती, विद्यार्थी उपस्थित होते. समाजातील गोरगरिबापर्यंत टायगर ग्रुप सध्या काम करत आहे. भविष्यातही ग्रुपच्यावतीने समाज उपयोगी कार्यक्रम हाती घेण्यात येतील असे टायगर ग्रुपचे अभिजीत पवार यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

## 'माय भारत' नोंदणी अभियानाला जिल्ह्यात प्रारंभ युवकांना स्वयंसेवा,नेतृत्व विकास आणि कौशल्यविकासाची सुवर्णसंधी; १५ ऑगस्टपर्यंत विशेष नोंदणी अभियान

धाराशिव दि.८ जुलै (जिमाका) देशातील युवकांना राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत सक्रिय सहभागी करून त्यांच्या नेतृत्वगुणांना चालना देण्यासाठी युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालयाच्या 'माय भारत' (चशीर धीीीं इहरीीं) उपक्रमांतर्गत जिल्ह्यात विशेष नोंदणी अभियानाला प्रारंभ झाला आहे.१ जुलै ते १५ ऑगस्ट २०२६ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या या अभियानाद्वारे जिल्ह्यातील अधिकाधिक युवक-युवतींना 'माय भारत' पोर्टलशी जोडून स्वयंसेवा, नेतृत्व विकास,कौशल्यविकास, अनुभवानिष्ठ शिक्षण तसेच विविध शासकीय उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे.

या अभियानादरम्यान जिल्ह्यातील महाविद्यालये,शाळा,युवक मंडळे, स्वयंसेवी संस्था तसेच विविध शासकीय कार्यालयांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर नोंदणी मोहीम राबविण्यात येणार आहे.युवकांनी मोबाईल क्रमांक,ई-मेल आणि आवश्यक कागदपत्रांच्या सहाय्याने 'माय भारत' पोर्टलवर विनामूल्य नोंदणी करून शासनाच्या विविध उपक्रमांचा लाभ घ्यावा,असे आवाहन जिल्हा युवा अधिकारी प्रतिक करंजकर यांनी केले आहे. तसेच उपलब्ध करून देण्यात आलेल्या लिंक अथवा क्यूआर कोडच्या माध्यमातूनही युवकांना 'माय भारत' पोर्टलशी सहज जोडता येणार आहे.

'माय भारत' हा केवळ नोंदणीचा उपक्रम नसून युवकांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला दिशा देणारा आणि समाजसेवेची संधी उपलब्ध करून देणारा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे.या माध्यमातून युवकांना स्वयंसेवा, सामाजिक बांधिलकी,नेतृत्व विकास,कौशल्यवृद्धी आणि विविध शासकीय कार्यक्रमांमध्ये प्रत्यक्ष सहभागाची संधी मिळणार असून त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार आहे.

जिल्ह्यातील सर्व युवक-युवती,माय भारत, राष्ट्रीय सेवा योजना (छडड), एनसीसी (छउउ), शैक्षणिक संस्था तसेच युवक संघटनांनी या विशेष नोंदणी अभियानात सक्रिय सहभाग नोंदवून अधिकाधिक युवकांची नोंदणी करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन मेरा युवा भारत, धाराशिव यांच्या वतीने करण्यात आले आहे.


## आस्थापनांनी नमुना ईआर-१ मधील त्रैमासिक मनुष्यबळ माहिती ३१ जुलैपर्यंत ऑनलाईन सादर करावी

धाराशिव (जिमाका) जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील आस्थापनांनी जून २०२६ अखेर संपणाऱ्या तिमाहीची नमुना ईआर-१ मधील त्रैमासिक मनुष्यबळ सांख्यिकी माहिती ३१ जुलै २०२६ पर्यंत ऑनलाईन पद्धतीने सादर करावी,असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, धाराशिवचे सहायक आयुक्त संजय गुरव यांनी केले आहे.

जिल्हा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,धाराशिव कार्यालयामार्फत जून २०२६ अखेर संपणाऱ्या तिमाहीसाठी नमुना ईआर-१ मधील त्रैमासिक सांख्यिकी माहिती संकलनाचे काम सुरू असून, या उपक्रमाला जिल्ह्यातील सर्व आस्थापनांचा १०० टक्के प्रतिसाद मिळणे अत्यंत आवश्यक आहे. संबंधित त्रैमासिक विवरणपत्र सादर करण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ असून,विहित मुदतीत ऑनलाईन पद्धतीने माहिती सादर करून कायद्याचे पालन करावे,असे आवाहन करण्यात आले आहे.तसेच प्रत्येक आस्थापनेने आपल्या नोंदणीचा तपशील पडताळून आवश्यक ती सर्व माहिती अद्ययावत करण्याचेही आवाहन करण्यात आले आहे.

सेवायोजन कार्यालये (रिक्तपदे सक्तीने अधिसूचित करणे) कायदा, १९५९ व नियम १९६० मधील कलम ५ (१) नुसार सर्व सार्वजनिक क्षेत्रातील तसेच शासकीय, निमशासकीय आणि संबंधित खाजगी क्षेत्रातील आस्थापनांनी, तसेच कलम ५ (२) अंतर्गत येणाऱ्या खाजगी आस्थापनांनी त्यांच्या आस्थापनांमधील सर्व कर्मचाऱ्यांची स्त्री,पुरुष व एकूण कर्मचारी संख्या यासह सांख्यिकी माहिती प्रत्येक तिमाहीत विहित नमुना ईआर-१ मध्ये नियमितपणे सादर करणे बंधनकारक आहे. ही माहिती महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता विभागाच्या www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने भरावयाची आहे.यासाठी जिल्ह्यातील सर्व आस्थापनांना जिल्हा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत यापूर्वीच युजर नेम व पासवर्ड उपलब्ध करून देण्यात आले आहेत. संबंधित संकेतस्थळावर लॉगिन करून प्रत्येक आस्थापनेने अचूक व अद्ययावत माहिती विहित मुदतीत सादर करावी,असेही आवाहन करण्यात आले आहे. या संदर्भात कोणत्याही प्रकारचे मार्गदर्शन किंवा सहकार्य आवश्यक असल्यास जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,धाराशिव कार्यालयाशी दूरध्वनी क्रमांक ०२४७२-२९९४३४ वर संपर्क साधावा.तसेच dharashivrojgargmail.com किंवा asstdiramp.osmanabadese.maharashtra.gov.in या ई-मेल आयडीवर उद्योजक नोंदणी क्रमांक व इतर आवश्यक तपशीलासह संपर्क साधून आवश्यक माहिती मिळवावी,असे सहायक आयुक्त संजय गुरव यांनी कळविले आहे.

## पोदार प्रेप धाराशिव येथे झुम्बा वर्कशॉप आयोजित



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- पोदार प्रेप धाराशिव येथे उत्साही आणि आनंददायी झुम्बा वर्कशॉप आयोजित करण्यात आले. या वर्कशॉपमध्ये पालकांनी आणि शिक्षकांनीही सहभाग घेतला. सर्वांनी एकत्र येऊन झुम्बा डान्सचा आनंद घेतला आणि शरीरसंचालनाच्या महत्त्वावर लक्ष केंद्रित केले.

कार्यक्रमाची सुरुवात उत्साही वातावरणात झाली, जिथे प्रशिक्षीकांनी झुम्बा डान्सच्या विविध शैलींचा परिचय दिला. विद्यार्थ्यांसोबत पालक आणि शिक्षक यांनीही जोरदार उत्साहाने डान्स केला, ज्यामुळे एकत्रितपणे शाळेत चांगली सामाजिक व आरोग्यदृष्ट्या फायदेशीर भावना निर्माण झाली.

हे कार्यक्रम विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्तीची आवड निर्माण करतात. तसेच पालक आणि शिक्षकांच्या सहभागामुळे शाळेतील समुदाय अधिक दृढ होतो असे शाळेचे प्राचार्य श्री वाल्मिक सोमासे सर यांनी म्हटले.

पोदार प्रेप च्या मुख्याध्यापिका रेश्मा संकपाळ यांनी पालकांचे आणि शिक्षकांचेही विशेष आभार व्यक्त केले. कार्यक्रमाला शाळेचे उपप्राचार्य श्री.निलेश जाधव सर कार्यकारी अधिकारी श्री. जीवन कुलकर्णी उपस्थित होते. शाळेतील झुम्बा वर्कशॉप चा आनंद आणि उत्साह हा एक अविस्मरणीय अनुभव ठरला.


## स्लरी फिल्टर घटकासाठी लाभार्थ्यांची सोडत १४ जुलैला अर्जदारांनी उपस्थित राहण्याचे आवाहन

धाराशिव (जिमाका) निती आयोगाच्या आकांक्षित जिल्हा कार्यक्रमांतर्गत सन २०२६-२७ मधील विंडो-।। (नाविन्यपूर्ण प्रकल्प) अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या स्लरी फिल्टर या घटकासाठी तुळजापूर तालुक्यात प्राप्त झालेल्या लाभार्थ्यांच्या अर्जांची सोडत मंगळवार,दि.१४ जुलै २०२६ रोजी काढण्यात येणार आहे.

ही सोडत तालुका कृषी अधिकारी कार्यालय,तुळजापूर येथे सकाळी ११ वाजता पार पडणार आहे. संबंधित घटकासाठी अर्ज केलेल्या लाभार्थ्यांची निवड पारदर्शक पद्धतीने सोडतीद्वारे करण्यात येणार असल्याने अर्जदारांनी वेळेत उपस्थित राहावे,असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

या प्रक्रियेमुळे लाभार्थी निवडीमध्ये पारदर्शकता राखली जाणार असून, संबंधित सर्व अर्जदारांनी स्वतः उपस्थित राहून सोडत प्रक्रियेची नोंद घ्यावी,असे तालुका कृषी अधिकारी, तुळजापूर यांनी कळविले आहे.

## रुईभर येथील मठाधिपती भगवान गिरी यांचे निधन



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)-रुईभर ता. धाराशिव येथील मठाधिपती भगवान गिरी (वय ९२) यांचे मंगळवारी रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास वृद्धापकाळाने निधन झाले. बुधवारी दि ८ रोजी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास विविध महंत व मठाधिपती यांच्या उपस्थितीत मंत्रोच्चाराच्या जयघोषात त्यांच्या पार्थिवावर रुईभर येथील मठात दफनविधी करण्यात आला. भगवान गिरी यांचे सामाजिक राजकीय तसेच विविध क्षेत्रात मोठे योगदान होते त्यांनी डॉ आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे उपाध्यक्षपद ही भुषविले होते यावेळी महंत श्याम चैतन्य महाराज माकणी महंत राजेंद्र गिरी महाराज देवताळा महंत मावजीनाथ योगी बाबाजी तुळजापूर महाराज तुळजापूर महंत व्यंकट महाराज तुळजापूर महंत घुमान गिरी महाराज एकंबी महंत गोपाळपुरी महाराज नागराळ महंत कृष्णानंद पुरी महंत मारुती महाराज हंताळ महंत कैलास गिरी महाराज चिंचोली काजळे मताधिपती म्हणून धनराज गिरी डॉ . आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुभाष (दादा) कोळगे माजी सरपंच पांडुरंग कोळगे ह भ प शिवाजी बारगुळे गुरुजी ह भ प जगन्नाथ महाराज गव्हाणे सदाशिव आप्पा कोळगे ह भ प काका महाराज सुर्यवंशी शिवाजीराव पवार त्र्यंबक जमदाडे मधुकर माने पोपट नलवडे सुब्राव लोमटे सुधाकर तिर्थकर यांच्यासह मोठ्या संख्येने महिलावर्ग रुईभर व परिसरातील नागरिक उपस्थित होते

## प्रा.डॉ.मारुती अभिमान लोंढे यांना स्वामी विवेकानंद आयकॉन ग्लोबल अवॉर्ड



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.मारुती अभिमान लोंढे यांना अलहाबाद (उत्तर प्रदेश ) येथील जीवरन फाउंडेशनच्या वतीने स्वामी विवेकानंद आयकॉन ग्लोबल अवॉर्ड २०२६ प्रदान करण्यात आला आहे.

प्रा. मारुती लोंढे हे सुप्रसिद्ध लेखक असून त्यांची ३६ पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. तीन पुस्तके प्रकाशित होण्याच्या मार्गावर आहेत. आंतरराष्ट्रीय , राष्ट्रीय स्तरावरील एकूण ६३ शोधनिबंध त्यांनी प्रकाशित केले आहेत. ते अनेक वेळा नेट ची परीक्षा उत्तीर्ण असून त्यांनी पीएच.डी व डिलीट पदवी देखील मिळवलेली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर या विद्यापीठांतर्गत ते पीएच.डी. चे मार्गदर्शक म्हणून देखील कार्यरत आहेत. स्पर्धा परीक्षा आणि नेट सेट या विषयावर त्यांनी अनेक महाविद्यालयांमध्ये व्याख्याने व आकाशवाणीवर मुलाखती दिलेल्या आहेत.

त्यांची वळण ही ग्रामीण कादंबरी सुप्रसिद्ध आहे. वर्तमानपत्रांमध्ये ते सातत्याने वेगवेगळ्या विषयावर लेखन करत असतात.

सदर पुरस्कार त्यांना शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ट योगदान,विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले कार्य,पुस्तक लेखन, संशोधन यासाठी २०२६ चा स्वामी विवेकानंद आयकॉन ग्लोबल अवॉर्ड प्रदान करण्यात आला आहे. या पुरस्काराबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष मा.प्राचार्य अभयकुमार साळुंखे, मुख्यकार्यकारी अधिकारी श्री कौस्तुभ गावडे, कोल्हापूर विभाग प्रमुख श्री श्रीराम साळुंखे, रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंबादास मंजुळकर यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

या पुरस्काराबद्दल प्रा.डॉ.मारुती अभिमान लोंढे यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

## लिंगनिदान करणारे हात नव्हे... तर समाजाच्या विवेकालाच बेड्या! मुलगा-मुलगी एक समान... तरीही गर्भातच का ठरतो जीवाचा न्याय?

धाराशिव,(रामेश्वर डोंगरे)-विज्ञानाने प्रगती केली, कायदे कडक झाले, जनजागृतीवर कोट्यवधी रुपये खर्च झाले... तरीही आज काही ठिकाणी पैशांच्या हव्यासापोटी गुपचूप बेकायदेशीर लिंगनिदान सुरू असल्याच्या चर्चा थांबलेल्या नाहीत. अजूनही काही कुटुंबांच्या मनातून वंशाला दिवा हवा ही जुनाट मानसिकता गेलेली नाही. त्यामुळे निष्पाप मुलींचा जन्म होण्यापूर्वीच तिच्या अस्तित्वावर घाला घालण्याचा प्रयत्न होतो, ही अत्यंत गंभीर आणि लाजिरवाणी बाब आहे.

राज्य शासनाने पीसीपीएनडीटी (PCPNDT) कायद्याची कठोर अंमलबजावणी करण्यासाठी राज्यस्तरीय टास्क फोर्स, जिल्हास्तरीय समित्या आणि तपास यंत्रणा अधिक सक्रिय करण्याचा निर्णय घेतला आहे. बेकायदेशीर लिंगनिदान करणाऱ्या डॉक्टर, दवाखाने आणि दलालांविरुद्ध कठोर कारवाईचे संकेत देण्यात आले आहेत.


मुलगी म्हणजे ओझे नव्हे, घराचा अभिमान!

आज प्रत्येक क्षेत्रात मुली देशाचे नाव उज्ज्वल करत आहेत. प्रशासन, सैन्य, विज्ञान, क्रीडा, उद्योग, राजकारण आणि अवकाश संशोधनापर्यंत मुलींनी आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे. मग अजूनही मुलगा-मुलगी असा भेद का?

आईच्या गर्भातील प्रत्येक जीवाला जगण्याचा समान अधिकार आहे. मुलगी जन्माला येण्यापूर्वीच तिचा जीव घेण्याचा विचार हा केवळ कायद्याचा भंग नसून मानवतेवरच घाला आहे.

**Name Change Declaration**
Here in this advertisement, I hereby declare that I have changed my name, which was: **MANIYAR SAYYAD ANJUM BEGUM RAYAZODDIN**
To **MANIYAR ANJUM BEGUM RIYAZODDIN**
Henceforth, I shall be known by the name **MANIYAR ANJUM BEGUM RIYAZODDIN** and I will use this name for all purposes in the future.
OLD NAME: **MANIYAR SAYYAD ANJUM BEGUM RAYAZODDIN**
NEW NAME: **MANIYAR ANJUM BEGUM RIYAZODDIN**
Address: Ghar.n.46 Samarth Nagar, Opposite bus Near Masjid, Osmanabad 413501, Maharashtra.
Aadhaar No.: 331834564751
Mobile No.: 9028348437

## धाराशिव बस स्थानकात चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी प्रत्येक प्लॅटफॉर्मवर सीसीटीव्ही कॅमेरे बसवावे-समाजसेवक इरफान उस्मान कुरेशी यांची मागणी



धाराशिव (प्रतिनिधी)- - धाराशिव बस स्थानकातील वाढत्या चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी प्रत्येक प्लॅटफॉर्मवर सीसीटीव्ही कॅमेरे अतिरिक्त सुरक्षारक्षक व साध्या वेशातील पोलिसांची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी समाजसेवक इरफान उस्मान कुरेशी यांनी महाराष्ट्र राज्य परिवहन धाराशिव विभागाचे विभाग नियंत्रक यांच्याकडे एका निवेदनाद्वारे दि.८ जुलै रोजी केली आहे.

दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, धाराशिव बस स्थानकात गेल्या काही दिवसापासून चोरीच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. दररोज एक-दोन चोरीच्या घटना घडत असून सोन्याचे दागिने, मोबाईल, पर्स तसेच इतर मौल्यवान वस्तू चोरीला जात आहेत. विशेषतः बसमध्ये चढताना किंवा गर्दीच्या वेळी चोरटे प्रवाशांना लक्ष्य करत असल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बस स्थानकात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असले तरी ते अपुऱ्या संख्येने असून अनेक प्लॅटफॉर्मवर कॅमेरेच उपलब्ध नाहीत. काही कॅमेरे योग्य ठिकाणी बसवलेले नसल्यामुळे चोरीच्या घटनांचे स्पष्ट चित्रीकरण होत नाही. त्यामुळे आरोपीचा शोध घेणे कठीण जात आहे. तसेच बस स्थानकात नियुक्त सुरक्षारक्षक अनेकदा त्यांच्या कर्तव्याच्या ठिकाणी उपस्थित नसल्याच्या तक्रारी सातत्याने येत आहेत. त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेवर गंभीर परिणाम होत आहेत.

विशेषतः ग्रामीण भागातील प्रवासी महिला व जेष्ठ नागरिक हे चोरट्यांचे सहज लक्ष्य ठरत आहेत. त्यामुळे जनहिताच्या दृष्टीने प्रत्येक बस स्थानकातील प्रत्येक प्लॅटफॉर्मवर उच्च दर्जाचे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत. सध्या असलेले सीसीटीव्ही यंत्रणेची तातडीने तपासणी करून आवश्यक त्या ठिकाणी कॅमेरे पुनर्स्थापित करण्यात यावेत. बस स्थानकात अतिरिक्त सुरक्षा रक्षकाची नियुक्ती करून त्यांच्या कामकाजावर नियमित देखरेख ठेवण्यात यावी. चोरीच्या घटनावर प्रभावी यंत्रणा मिळवण्यासाठी पोलीस विभागामार्फत साध्या वेशातील पोलिसांची नियुक्ती व स्थानक परिसरात नियमित गस्त वाढवून प्रवाशांच्या सुरक्षेसाठी विशेष सुरक्षा योजना कराव्यात. विशेष म्हणजे धाराशिव बस स्थानकातून दररोज हजारो प्रवासी प्रवास करतात. त्यांच्या जीवित व मालमत्तेची सुरक्षा सुनिश्चित करणे ही प्रशासनात जबाबदारी आहे. त्यामुळे या गंभीर विषयाची दखल घेऊन तात्काळ आवश्यक ती कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निर्माण कुरेशी व जैनोद्दीन मुजावर यांनी केली आहे.

## उमरगा आरटीओ चेक पोस्टवर ओव्हरलोडचा सुळसुळाट? जीवाशी खेळ सुरूच; प्रशासनाचे डोळेझाक की संगनमत?

धाराशिव,(रामेश्वर डोंगरे)-धाराशिव जिल्ह्यातील उमरगा आरटीओ चेक पोस्ट परिसरातून दिवस-रात्र ओव्हरलोड वाहतूक सुरू असल्याचे चित्र समोर येत आहे. लोखंडी स्क्रॅप, दगड, वाळू आणि इतर जड मालाने क्षमतेपेक्षा अनेक पटीने भरलेले ट्रक भरधाव वेगाने धावत असल्याने राष्ट्रीय महामार्गावर प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या जीवाला गंभीर धोका निर्माण झाला आहे. मात्र एवढे सर्व उघडपणे सुरू असतानाही संबंधित यंत्रणा आणि तपासणी पथके नेमके काय करत आहेत, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

उमरगा आरटीओ चेक पोस्टवरून ओव्हरलोड ट्रकांची सर्रास ये-जा होत असून राष्ट्रीय महामार्गावर अपघाताचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे. वाहन नियमांची उघडपणे पायमल्ली; कारवाई मात्र नगण्य दिसून येत आहे

चेक पोस्ट असूनही ओव्हरलोड वाहनांना मोकळा मार्ग का?

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, अनेक ट्रक क्षमतेपेक्षा जास्त माल भरून महामार्गावरून वेगाने धावत आहेत. अशा वाहनांमुळे ब्रेक निकामी होणे, टायर फुटणे, वाहन पलटी होणे किंवा समोरून येणाऱ्या वाहनांवर नियंत्रण सुटणे अशा दुर्घटनांचा धोका कायम असतो. तरीही या वाहनांवर प्रभावी कारवाई होत नसल्याने संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. नियमांचे पालन करणाऱ्या वाहनधारकांवर कठोर कारवाई केली जाते; मात्र ओव्हरलोड वाहनांकडे दुर्लक्ष का केले जाते? उमरगा आरटीओ चेक पोस्टवर तपासणी होते की फक्त औपचारिकता? असा प्रश्न आता सर्वसामान्य नागरिक विचारत आहेत.

रस्ते सुरक्षा ही केवळ घोषणांपुरती न राहता प्रत्यक्षात उतरविण्याची वेळ आली आहे. प्रत्येक ओव्हरलोड वाहनाची वजन तपासणी करून दोषींवर कठोर दंडात्मक कारवाई झाली पाहिजे. अन्यथा एखादी मोठी दुर्घटना घडल्यानंतर जागे होण्यात काहीच अर्थ उरणार नाही.

लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708
9284321472

## धाराशिवात भेसळीचा सुळसुळाट; अन्न व औषध प्रशासन कधी लक्ष देणार? दूध विक्रेते, बेकरी, हातगाडी, चायनीज विक्रेते बिनधास्त

धाराशिव (शहर प्रतिनिधी शेख अंजुम)- धाराशिव जिल्ह्यात अन्नपदार्थांमध्ये भेसळीचे प्रकार दिवसेंदिवस वाढत असल्याची गंभीर चर्चा सर्वत्र सुरू असताना, अन्न व औषध प्रशासनाची कारवाई मात्र अद्याप दिसून येत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. दूध विक्रेते, बेकरी उत्पादक, मिठाई विक्रेते, हातगाडीवरील खाद्यपदार्थ विक्रेते तसेच चायनीज फास्टफूड विक्रेते कोणत्याही भीतीशिवाय व्यवसाय करत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

**दूध विक्रेत्यांवर एकही मोठी कारवाई नाही!**

धाराशिव शहरासह जिल्ह्यात अनेक ठिकाणी दूध व दुग्धजन्य पदार्थांच्या गुणवत्तेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तरीही अद्याप एकाही दूध विक्रेत्यावर ठोस कारवाई झाल्याचे दिसत नाही. त्यामुळे संबंधित विभागाच्या कार्यक्षमतेवरच प्रश्न उपस्थित होत आहेत.

**बेकरी, मिठाई आणि चायनीज सेंटरही तपासाच्या बाहेर?**

बेकरी उत्पादनांमध्ये वापरले जाणारे साहित्य, कालबाह्य पदार्थ, कृत्रिम रंग, निकृष्ट तेल तसेच हातगाडीवरील चायनीज पदार्थांमध्ये वापरले जाणारे सॉस, तेल आणि इतर साहित्याची तपासणी होत नसल्याची तक्रार नागरिक करत आहेत. आरोग्याशी थेट संबंधित विषय असूनही प्रशासनाचे दुर्लक्ष धोकादायक ठरत आहे, अशी भावना व्यक्त होत आहे.

**कारवाई नाही म्हणूनच भेसळ वाढली!**

नियमित नमुने तपासणे, अचानक छापे टाकणे आणि दोषींवर कठोर कारवाई करणे ही अन्न व औषध प्रशासनाची जबाबदारी आहे. मात्र कारवाईचा धाक नसल्यामुळे काही विक्रेते नियमांची पायमल्ली करत असल्याचा आरोप सर्वसामान्य नागरिक करत आहेत.

**जिल्हाभर विशेष तपासणी मोहीम राबवावी.**

दूध विक्रेते, बेकरी, मिठाई दुकाने, चायनीज व हातगाडी विक्रेत्यांची तातडीने तपासणी करावी. भेसळ करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करून परवाने रद्द करावेत. तपासणीचे अहवाल सार्वजनिक करावेत.

सण-उत्सव काळात विशेष पथके नेमून दररोज छापेमारी करावी धाराशिव जिल्ह्यात नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांवर अन्न व औषध प्रशासनाची धडक कारवाई नेमकी कधी होणार? दूध विक्रेते, बेकरी, हातगाडी आणि चायनीज विक्रेते यांच्यावर कारवाईचा धाक निर्माण होणार की नाही? आरोग्याशी तडजोड सहन केली जाणार नाही. भेसळखोरांवर तातडीने कठोर कारवाई करा, अन्यथा नागरिकांचा रोष आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

## मद्यपी चालकावर गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर पोलीस अंतर्गत गणेश , वय ३९ वर्षे, रा. वाघोली ता. जि. धाराशिव हे दि.०८.०७.२०२६ रोजी १०.४५ आपल्या ताब्यातील वाहन क्र एमएच २५ एएफ ७३३५ हे छत्रपती शिवाजी महाराज चौक सांजा कडे जाणारे रोडवर मद्यधुंद अवस्थेत चालवून कलम-१८५ मोवाका चे उल्लंघन केले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द धाराशिव शहर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## पाणी भरण्याचे कारणावरुन शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, बकेटने मारहाण

धाराशिव (प्रतिनिधी)- नळदुर्ग पोलीस ठाणे अंतर्गत शिवानंद, लक्ष्मी जि. धाराशिव दोघे रा. चिवरी ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.०८.०७.२०२६ रोजी चिवरी येथे फिर्यादी -मनिषा सतिष धप्पाधुळे, वय ३५ वर्षे, रा. चिवरी ता.तुळजापूर जि. धाराशिव यांना दोघांनी पाण्याच्या टाकीजवळ पाणी भरण्याचे कारणावरुन शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, स्टिलचे बकेटने मारहाण करुन जखमी केले. जिवे ठार मारण्याची धमकी दिली. मनिषा धप्पाधुळे यांनी दि.०८.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे नळदुर्ग येथे गुन्हा नोंदवला आहे.

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649